अल्केमिस्ट्री



। राजू परुळेकर



# जयश्री (नवाकाळ) खाडिलकर

जयश्री खाडिलकर-पांडे यांना 'नवाकाळ'च्या संपादिका म्हणून नव्हे तर एक जागतिक दर्जाच्या बुद्धिबळपटू म्हणून जग ओळखतं. परंतु मी त्यांनी जीवाला जीव देणारी मैत्रिण, एक अतिशय सहृदय मानवतावादी आणि मराठी माणसाबद्दल खरीखुरी कळवळ असणारी व्यक्ती म्हणून ओळखतो.

मराठीत स्त्री संपादिका मुळातच कमी. त्यात आक्रमक आणि सडेतोड लिहिणाऱ्या संपादिका फक्त जयश्री खाडिलकरच आहेत. 'नवाकाळ'चे संपादकपद ज्यांनी गाजवलेले आहे त्या निळुभाऊंच्या जयश्री या कन्या. वडिलांच्या लेखणीतला तोच जहालपणा जयश्रीताईमध्ये आलेला आहे. माझ्या व्यतिरिक्त (अर्थात संपादकांच्या साहाय्याने) मूठभर जैन (सर्व नव्हे!) थैलीशहांच्या दादागिरीविरुद्ध लिहिण्याचं धाडस फक्त जयश्रीच करू शकते. त्यामुळे मराठी माणसाचा ऱ्हास थांबेल अथवा नाही हे मला माहीत नाही. दरिद्रीपणाचा शाप मराठी माणसाच्या आयुष्यातून त्यामुळे जाईल वा नाही, हे मला माहीत नाही. पण जयश्रीने थैलीशहांच्या झुंडशक्तीसमोर अत्यंत विपरीत आणि विषम परिस्थितीपुढे गुडघे टेकायला नकार दिला हे महाराष्ट्राच्या इतिहासात नमूद होईल.

महाराष्ट्रातले पाचही राजकीय पक्ष हे द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळेस जसे गुडघ्यात माना घालून आपण त्या गावचेच नाही असे भीष्म, द्रोण, विदुर आणि त्यांच्यासारखे समर्थ व शहाणे बसलेले होते तसे हे राजकीय पक्ष बसलेले असतात. तेव्हा जयश्री विरोधी पक्षांचं काम एक हाती करत होती. जणू तिने मराठी माणूसरूपी द्रौपदीला वस्त्रहरणाच्या वेळी साड्या पुरवल्या. हे असं करण्याची तिची काही पहिली वेळ नव्हे. अनेक षडयंत्र आणि भ्रष्टाचार तिने कुणाचीही तमा न बाळगता वेशीवर टांगलेले आहेत. त्याबद्दल तिचा हवा तसा सत्कार तर कुणी केला नाहीच पण खिरापतीसारखी जी अनेक सरकारी पारितोषिकं वाटली जातात त्या सरकारी पारितोषिकात रंभा, उर्वशी यांना बरंच काही मिळालं. पण जयश्रीच्या माध्यमातल्या लढ्याची दखल कुणीही घेतली नाही.

खरं तर उद्धव आणि राज ठाकरेंसाठी जयश्रीचा जेवढा जीव जळतो ते पाहून मलाही मोठं आश्चर्य वाटतं. पण त्यातला श्लेष खरा वेगळा आहे. राज माझा परममित्र आहे. उद्धवही मित्रच आहे. पण जयश्रीचं काय? याचं विश्लेषण थोडं वेगळं करावं लागेल?

जयश्रीचा जीव दक्षिण आणि मध्य मुंबईतल्या बेघर आणि असहाय गिरणी कामगारांमध्ये व मराठी माणसांमध्ये अडकलाय. किंबहुना संपूर्ण महाराष्ट्रातल्या मराठी माणसामध्येच त्यांचा जीव अडकलाय. त्यामुळे उद्धव किंवा राज ठाकरेंचा उल्लेख त्यांच्या अग्रलेखात वारंवार येतो. त्याचा मैत्री किंवा परममैत्री यांसारख्या गोष्टींशी काहीही संबंध नाही. अनेकदा जयश्री मला उद्धव व राज यांच्यासाठी झाड झाड झाडते. मी तिची पंचिंग बॅग आहे. जणू राज आणि उद्धव माझ्या घरातल्या सोफ्यावर पायावर पाय टाकून माझं काय मत आहे ते ऐकून लढाईला जायला तयार बसलेले असतात. पण हे जयश्रीला मी समजावू शकत नाही. कारण तिची तळमळ आणि तिचा अंशतः राजकीय भोळेपणा. ती बोलत असते तेव्हा मी मनात ओक्साबोक्सी रडत असतो. याचं कारण मला तिचं पटतं.

पण मी तिच्या मार्गाने लढू शकत नाही. लढण्याकरता दुसऱ्यावर विश्वास ठेवायचा माझा पिंडच नाही. अख्खी ठाकरे फॅमिली नव्हती तेव्हा मराठी माणूस नव्हता का? आणि ठाकरे फॅमिली अख्खी आणि एकत्र होती आणि त्यांच्या हाती राज्यात पूर्णतः आणि केंद्रात अंशतः सत्ता होती तेव्हा मराठी माणसाचा कोणता सुवर्णकाळ आला होता? मी माझ्या स्वतःच्या दमावर लढणारा माणूस आहे. गिरणी कामगार मराठी माणसाप्रमाणे. या महाराष्ट्रातल्याच नव्हे तर देशातल्या बोकाळलेल्या फॅमिल्यांना मी फाट्यावर मारतो! ते आपल्यासारखेच हाडामासाचे आणि आपल्यासारखेच

**'नवाकाळ'ला ज्या उंचीवर निळुभाऊंनी नेऊन ठेवलंय त्या उंचीवर जयश्रीला 'नवाकाळ'ची प्रतिमा ठेवता येईल का, हा यक्षप्रश्न सुरुवातीला माझ्यासमोर होता. पण जयश्रीने ते शिवधनुष्य लीलया पेललं.**

डरपोक (प्रसंगी आपल्यापेक्षा डरपोक) आहेत यावर माझी श्रद्धा आहे. मी तळागाळातल्या शेवटच्या माणसावर विश्वास ठेवतो. लढतो तो. लाठ्या खातो तो. खस्ता खातो तो. तो पाय ओढत कोर्टाच्या तारखांना मराठी माणसासाठी हजर राहतो. त्याच्या नशिबी परदेशी वाईन आणि दिमतीला हुक्का नसतो. हे माझं विजय तेंडुलकरी 'स्कूल ऑफ थॉट' आहे. ते मी बदलू शकत नाही. कारण ते कितीही कटू आणि नुकसानदायी असलं तरी तेच खरं कटू सत्य आहे. पण हे माझं म्हणणं मी जयश्रीला पटवू शकत नाही. मग ती मला 'नवाकाळ'साठी लिहिण्याचा आग्रह करते. पण मी हे जे काही लिहीन ते ती छापू शकत नाही. कारण तिच्या काही श्रद्धा आहेत. अन् मी मूर्तिभंजक लेखक आहे. अनेक राजकीय नेते माझे परममित्र असले तरी मी त्यांच्या राजकीय पक्षाचा मित्र नाही, शत्रूही नाही. मी त्यांच्याकडे एका छिद्रान्वेषी राजकीय विश्लेषकाप्रमाणे पाहतो. हे गणित जयश्रीला समजावणं कठीण. म्हणून मी तिचा ओरडा खाऊन गप्प बसतो.

जयश्रीचं सर्वात मोठं यश म्हणजे तिने निळुभाऊ खाडिलकरांचं संपादकपदाचं शिवधनुष्य अत्यंत लीलया पेललं. मुंबईतल्या सर्व भांडवली वृत्तपत्रांत 'नवाकाळ' टिकणं आणि वाढून समृद्ध होणं अत्यंत आवश्यक आहे. नाही तरी माध्यमातला मराठी माणसाचा बॅलन्स ऑफ पॉवर संपलेलाच आहे. नारायण राणेंचा 'प्रहार' आता बाळसं धरतोय. तिकडे 'सामना' हा संजय राऊत यांच्या वैयक्तिक मतांची कीर्द-खतावणी बनलेली आहे. अशा वेळी सामान्य मराठी माणसासाठी वर्तमानपत्र 'नवाकाळ' हेच उरतं.

सर्वसाधारणपणे ज्या मुलांचे वडील फार कर्तृत्ववान असतात त्यांची मुलं कर्तृत्वात खुरटतात. निळुभाऊ खाडिलकरांच्या तिन्ही मुली बुद्धिमान व कर्तृत्ववान ठरल्या. ज्या उंचीवर निळुभाऊंनी 'नवाकाळ'ला नेऊन ठेवलंय त्या उंचीवर जयश्रीला 'नवाकाळ'ची प्रतिमा ठेवता येईल का, हा यक्षप्रश्न सुरुवातीला माझ्यासमोर होता. तिचा स्वभाव इंपल्सिव्ह असल्याने मला काळजी वाटत होती. पण जयश्रीने ते शिवधनुष्य लीलया पेललं.

फक्त जयश्रीला एक सूक्ष्म गोष्ट ध्यानात आलेली नाही किंवा आलेली असेल तर ते तिच्या लिखाणात दिसत नाही. ते म्हणजे आपले सर्व राजकारणी एवढे माजलेले आहेत की कुणाचीही सामान्य माणसाबद्दलची कळकळ त्यांच्या ह्रदयाला ते लावून घेत नाहीत. ते त्यांच्या फाईल्स, पेटी, खोके आणि सर्वोत्कृष्ट लाइफस्टाइल, उत्तम परदेशवाऱ्या, तिथे प्रॉपर्टी यात मग्न आहेत. त्यामुळे त्यांच्याबद्दल लेख, अग्रलेख कितीही कडक लिहिले तरी त्यांच्या ह्रदयावर चराही उमटत नाही. जयश्रीला वाटतं की सामान्य माणसाचा धुवाँधार प्रतिसाद तिचा मुद्दा राजकारण्यांपर्यंत पोहोचवेल. तर जयश्री, तसं नाहीये. आता या सर्वांच्यातच बांबू घालण्याची वेळ आलेली आहे. यांचे व्यवहार, अकाऊंट्स, जमिनीचे सातबारे, परदेशातली संपत्ती जनतेसमोर मांडायला हवी. त्यानंतर जनतेचाही फार विचार न करता जनतेलाच ठरवू दे की, जनतेला हेच नेते हवे आहेत की त्यांच्या पार्श्वभागावर लाथ हाणून त्यांच्या जागी दुसरे मातीतले नेते उभे केले पाहिजेत वा नाही?

जयश्री या निर्लज्ज नेत्यांना एकाच वेळी ठोकू पाहते तर दुसरीकडे सांभाळू पाहते. ते तिची खासगीत दखल घेत नाहीत. जयश्रीने आपल्या पाठीवरचं निळुभाऊंच्या काळाच्या ओझ्याचं दप्तर काढून ठेवलं पाहिजे. आपली कोरी पाटी (ब्रॅण्ड तोच ठेवून) नव्याने, अधिक धैर्याने व वैयक्तिक संबंधांची पर्वा न करता लिहिली पाहिजे. हे मुर्दाड नेते वाघोबासाहेब म्हटलं तरी जनतेला लुटणार. वाघरावजी म्हटलं तरी आपल्या तंगड्या वाइनसोबत खाणार. त्यापेक्षा त्यांच्या दोन डोळ्यांमध्येच वार काढलेला काय वाईट?

जयश्री हळवी आहे. तिला नाही हे पटणार. ती फक्त माझ्यावर रागावू शकते. मी तिच्याकडे लिहीत नाही म्हणजे माझा तिला पाठिंबा नाही असं वाटतं. पण असं नाहीये. मला तिच्यासारख्या जीवाभावाच्या मैत्रिणीकडे लिहायला काय अडचण असणार? उलट तिच्यासाठी काही करता आलं तर मला आनंदच वाटतो. पण तिची 'नेते राखा नि त्यांच्याकरवी जनता राखून घ्या' ही भूमिका स्वीकारार्ह नाही. माझी मूस वेगळी. जयश्रीला त्याचा त्रास होईल. मला ते नको आहे. मी माझा क्रूस स्वतःच्या खांद्यावर वाहणारा माणूस आहे. मला गुरू नाही. माझे शिष्य नाहीत. माझा गॉडफादर नाही. मी कुणाचा गॉडफादर नाही. माझ्या (सो कॉल्ड) यशाचं श्रेय मी माझ्या खऱ्या मित्रांना देतो. (मित्र म्हणवून गळ्यावर सुरी फिरवणाऱ्यांना नाही!)

जयश्री ही माझी अशीच एक मैत्रिण आहे. जी स्वप्नातसुद्धा माझं भलं चिंतिते. कधी माझं ऐकते. कधी मला माथेफिरु मानून माझं म्हणणं कानाडोळा करण्यायोग्य मानते. तरीही एक मान्य करायला पाहिजे की तिच्या नेतृत्वाखाली 'नवाकाळ' कात टाकतो आहे. परंतु आधुनिक तंत्रज्ञान, भांडवली वृत्तपत्रांची अजस्त्र गुंतवणूक, सतत बदलणारी मूल्यं, बदलती तरुण पिढी या साऱ्यांसोबत जयश्रीला आपली नौका हाकायची आहे. हे सोपं नाही. माझ्यासारखे मित्र तिला यात मदत करू शकतात. पण ती एक हट्टी, रुसलेली मुलगी बनते. मग कम्युनिकेशनचे सर्व मार्ग ती बंद करते. हे बऱ्याचदा निराशाजनक असतं. ती पापभिरु आहे. सरळ सात्विक आहे. मैत्रीसाठी जीव टाकणारी आहे. पण बदललेल्या मूल्यव्यवस्थेकडे थोडं दुर्लक्ष करणारी आहे.



सर्वात महत्वाचं म्हणजे तिच्या यशाचा मार्ग सर्वांना सांभाळून घेत जात नाही. तिला अनेकांची (मग त्यात प्रामुख्याने राजकारणी आलेच) शिकार करावीच लागेल. तिचं सर्वदूर पसरणारं भय हाच तिचा पुढे यूएसपी राहील. नाही तर तिची गत कपिला गायीसारखी होईल. सगळे पापी नेते सकाळी उठून फोनवरून तिला नमस्कार करून दिवसभर जनतेवर अनन्वित अत्याचार करायला मोकळे.

जयश्री, तुला बदलावंच लागेल. नाही तर परिस्थिती तुलाच बदलवेल. मला तुझा अभिमान आहे. पण मी जे सांगतो ते भाकीत चुकत नाही. बस सुटल्यावर मला 'मानला तुला' असा फोन करू नकोस! तू जे करते आहेस त्याला माझा सलाम. पण माझे ज्ञान, समज आणि चतुराईला थोडेतरी मार्क देशील की नाही? तू जागतिक कीर्तिची बुद्धिबळपटू आहेस. राजाला आधी कॅसल कर. मग सिसिलियन आक्रमण कर. विजय तुझाच आहे. विजय तुझाच असो. सदैव!

✉ raju.parulekar@gmail.com